## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(का.अ. ते प्र.अ)/मफुसल/२२५/२०१६ मुंबई , दिनांक : २२/०६/२०१७

# -:आदेश:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षक (राजपत्रित / अराजपत्रित गट ब ) यांना वरिष्ठ कार्यालय अधीक्षक /प्रशासकीय अधिकारी (राजपत्रित गट ब ) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र | कार्यालय अधीक्षकाचे नावे | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री शरद तुकाराम बोडके | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ५, दौंड | पोलीस अधीक्षक, ए.सी.बी.,अमरावती |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५, दौंड.

२. कार्यालय अधीक्षक, श्री शरद तुकाराम बोडके यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर समादेशक यांनी कृपया श्री शरद तुकाराम बोडके यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. कार्यालय अधीक्षक, श्री शरद तुकाराम बोडके यांचेविरुध्द काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी कार्यालय अधीक्षकांची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी हजर होण्याकरीता दिनांक २३/०६/२०१७ म.नं. पर्यत न चुकता कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

४. घटक प्रमुखांनी संबंधित कार्यालय अधीक्षक यांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर/११००(२)/अेसईआर् -३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त कार्यालय अधीक्षकांनी नोंद घ्यावी.

६. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. श्री शरद तुकाराम बोडके हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत (दिनांक २३/०६/२०१७ पर्यत** ) घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना दिनांक २३/०६/२०१७ रोजी न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच दिनांक २३/०६/२०१७ मध्यानंतर समादेशक यांनी त्यांच्या आस्थापनेवर श्री बोडके. यांचे वेतन व भत्त्याची आकारणी करु नये.

८. पदोन्नती आदेशानंतर संबंधित कार्यालय अधीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा. तसेच ते पदोन्नतीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्यानंतर पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होत नसतील तर त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करावी.

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो , अमरावती.

२. पोलीस अधीक्षक यांनी श्री शरद तुकाराम बोडके हे पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२ / ३६
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

प्रत सविनय सादर,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(अनुपकुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.